Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2 – 2025 Impact Factor: 7.665

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

# स्टार्स प्रकल्प (STARS PROJECT) अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा खडकी बु. येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे मराठी, इंग्रजी व गणित विषयातील गुणांचा सहसबंधात्मक अभ्यास.

**प्रशांत बळीराम लवंगे,** संशोधक विद्यार्थी, के. सी. ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

**डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे,** संशोधन मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, बी. पी. आर्ट्स, एस. एस. ए. सायन्स व के. के. सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव जि. जळगाव

**सारांश**

स्टार्स प्रकल्प भारतीय शिक्षण मंत्रालयाअंतर्गत, शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने सुरु केला आहे. हा प्रकल्प भारतातील सहा राज्यांमध्ये शिक्षण गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि प्रशासनात सुधारणा करण्यासाठी याची अंमलबजावणी केली जात आहे. या स्टार्स प्रकल्प अंतर्गत घेतलेल्या परीक्षेतील मराठी, इंग्रजी व गणित विषयातील गुण यामध्ये काही सहसंबंध आहे का ? या प्रकल्पाची दिशा तपासता यावी यासाठी संशोधकाने सदर संशोधन हाती घेतले.

## प्रस्तावना

स्टार्स प्रकल्प ( STARS PROJECT ) (Strengthening Teaching-learning and Results For States ) हा केंद्र पुरस्कृत प्रकल्प आहे ज्याला जागतिक बँकेने आर्थिक सहाय्य केले आहे. हा प्रकल्प शिक्षण मंत्रालया अंतर्गत, शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने सुरु केला आहे. हा प्रकल्प भारतातील सहा राज्यांमध्ये शिक्षण गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि प्रशासनात सुधारणा करण्यासाठी याची अंमलबजावणी केली जात आहे. या प्रकल्पाचा फायदा १५ लाख शाळांतील ६ ते १७ वयोगटातील अंदाजे २५ कोटी विद्यार्थ्यांना होईल. विद्यार्थ्यांव्यतिरिक्त या प्रकल्पाचा फायदा सहा राज्यातील १ कोटी शिक्षकांनाही होईल. सार्वजनिक शिक्षणाला बळकटी देण्याच्या उद्देश्याने हा प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. हे भारताच्या “ सर्वांसाठी शिक्षण” या उद्दीष्टाला देखील समर्थन देते. स्टार्स प्रकल्प राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दृष्टीकोनाला पुढे नेतो ज्यामध्ये सर्वांसाठी समान शिक्षणाची कल्पना आहे.

### स्टार्स प्रकल्पाची मुख्य उद्दिष्टे

१. **शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे:** अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपाययोजना करणे. अध्ययन अध्यापन प्रक्रिया जर प्रभावी झाली तर गुणवत्तेत आपोआपच फरक पडून विद्यार्थी गुणवत्ता वाढेल. त्यातून शाळेची गुणवत्ता वाढेल. शेवटी सर्व शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

२. **शिक्षकांना सक्षम करणे:** शिक्षकांना विविध नाविन्यपूर्ण प्रशिक्षण देऊन आणि आवश्यक विविध उपाययोजना करणे. नाविन्यपूर्ण प्रशिक्षणे झाल्याने शिक्षकांना नवीन गोष्टी माहित होतील व त्यांचा वापर ते अध्यापनात करतील. त्यामुळे शिक्षकाच्या ज्ञान कक्षा वृंदावतील, शिक्षक सक्षम बनेल.

३. **मुल्यांकन प्रणाली सुधारणे:** नियमित व संकलित चाचण्यांद्वारे मूल्यमापन केल्याने विद्यार्थ्यांची सततची प्रगती समजेल. विद्यार्थी प्रगती होत आहे की नाही ते सतत कळल्याने प्रगतीचे मुल्यांकन करणे सोपे होईल.

४. **शिक्षणात सुधारणा आणणे:** बरेच विद्यार्थी विविध कारणांनी शिक्षणापासून वंचित राहतात. या विद्यार्थ्यांसाठी विशिष्ट उपाययोजना करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे शक्य होईल. शिक्षणाच्या प्रवाहात आल्याने त्यांनाही विविध शैक्षणिक संधी उपलब्ध होतील.

५. **प्रशासकीय क्षमता वाढविणे:** शिक्षण विभागाच्या कार्य क्षमतेत कमालीची मरगळ दिसून येते. कामात अनियमितता दिसून येते. जर कामात नियमितता आणता आली तर प्रशासकीय क्षमता वाढेल.

**प्रकल्पाची अंमलबजावणी**

सदर प्रकल्प हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओडीसा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि केरळ या सहा राज्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

**स्टार्स प्रकल्पाचे महत्व**

१. स्टार्स प्रकल्प शिक्षण क्षेत्रातील महत्वपूर्ण सुधारणा घडवून आणण्यास मदत करेल.
२. भारतीय शिक्षण व्यवस्थेसाठी एक महत्वाचा टप्पा ठरेल.
३. भारतीय शिक्षण व्यवस्थेत गुणवत्ता वाढविण्यास मदत होईल.
४. शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांना किमान अध्ययन क्षमता प्राप्त होतील.

**स्टार्स प्रकल्पाची गरज**

१. अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल.
२. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS ) मधील संपादणूक वाढविण्याच्या दृष्टीकोनातून मदत होईल.
३. अध्ययनात मागे असणारया विद्यार्थ्याना पुढे नेण्याच्या दृष्टीकोनातून कृतिकार्यक्रम तयार करणे जेणेकरून अंमलबजावणीस दिशा प्राप्त होईल.
४. शिक्षणापासून वंचित मुले प्रवाहात आल्यानंतर त्यांच्या क्षमता मिळवून देता येतील.

**स्टार्स प्रकल्पाचे फायदे**

१. शिक्षण आणि शाळांमधील सुविधा यांच्यातील समतोल साधणे.
२. शिकण्याची गुणवत्ता सुधारेल.
३. शिकविण्याची गुणवत्ता सुधारेल.
४. शिक्षक व विद्यार्थ्याना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणे दिले जाईल.
५. गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल.
६. गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्यामुळे उच्च गुणवत्ता मिळेल व उज्वल भविष्य घडविण्यास मदत होईल.

**प्रकल्पासमोरील आव्हाने**

१. शासनाने वेळेच्या वेळेवर शिक्षक नियुक्त्या करणे.
२. रिक्त जागा त्वरित भरणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

३. शिक्षकांसाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणे आयोजित करणे.
४. प्रकल्पातून उचित उद्दिष्टे साध्य करणे.

**प्रकल्पासाठी निधी**

१. स्टार्स प्रकल्पाची एकूण किंमत ५,७१२ कोटी रुपये आहे.
२. जागतिक बँकेने ५०० दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे ३७०० कोटी रुपयाचे आर्थिक सहाय्य दिले आहे.
३. हे कर्ज जागतिक बँकेचे कर्ज देणारी शाखा असलेल्या IBRD कडून देण्यात आले आहे.
४. जागतिक बँकेने ५०० दशलक्ष डॉलर्सच्या कर्जासाठी १७.५ वर्षांची अंतिम मुदत आणि ५ वर्षांचा अतिरिक्त कालावधी दिला आहे.

स्टार्स प्रकल्पाची परिणामकारकता तपासणे विद्यार्थ्यांमध्ये आलेल्या क्षमता तपासणे, या उद्देशाने संशोधकाने सदर संशोधन हाती घेतले आहे.

**समस्या विधान:** स्टार्स प्रकल्प (STARS PROJECT) अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा खडकी बु येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे मराठी, इंग्रजी व गणित विषयातील गुणांचा सहसबंधात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाची गरज**

१. किमान अध्ययन क्षमता कितपत साध्य झाल्या हे समजण्यासाठी.
२. विद्यार्थ्यांना कोणत्या क्षमता प्राप्त झाल्या आहेत कोणत्या बाकी आहेत हे कळण्यासाठी.
३. क्षमता प्राप्त व अप्राप्त असे वर्गीकरण करण्यासाठी.
४. उर्वरित क्षमता प्राप्त करण्यासाठीचे नियोजन करण्यासाठी.

**संशोधनाचे महत्व**

१. तीनही विषयांची तुलना करता येईल.
२. कोणत्या विषयात मागे आहेत हे कळेल.
३. राहिलेल्या क्षमता मिळविण्यासाठी नियोजन करता येईल.

**कार्यात्मक व्याख्या**

१. स्टार्स प्रकल्प: केंद्र पुरस्कृत एक प्रकल्प.
२. अनुदानित: ज्यांना शासनाकडून आर्थिक सहाय्य भेटते.
३. आश्रमशाळा: आदिवासी जमातींसाठी शासनाने सुरु केलेल्या निवासी शाळा.
४. विद्यार्थी: शिक्षण घेणारी व्यक्ती.
५. मराठी: प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील एक अनिवार्य विषय.
६. इंग्रजी: प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील एक अनिवार्य विषय.
७. गणित: प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील एक अनिवार्य विषय.
८. सहसंबंध: दोन किंवा अधिक चलातील संबंध दर्शविणारे सांख्यिकीय मापन.
९. अभ्यास: ज्ञान किंवा कौशल्य मिळविण्यासाठी एखाद्या गोष्टीचा सखोल सराव करणे.
१०. चाळीसगाव: जळगाव जिल्ह्यातील एक तालुका.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**संशोधनाची उद्धीष्ट्ये**

१. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी व इंग्रजी विषयातील गुणांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
२. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी व गणित विषयातील गुणांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
३. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी व गणित विषयातील गुणांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
४. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी, इंग्रजी व गणित विषयातील गुणांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी व इंग्रजी विषयातील गुणांतील सहसंबंधात सार्थ फरक आढळत नाही.
२. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी व गणित विषयातील गुणांतील सहसंबंधात सार्थ फरक आढळत नाही.
३. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी व गणित विषयातील गुणांतील सहसंबंधात सार्थ फरक आढळत नाही.
४. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी, इंग्रजी व गणित विषयातील गुणांतील सहसंबंधात सार्थ फरक आढळत नाही.

**व्याप्ती:** सदरील संशोधन हे जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळामध्ये केले जाणार आहे.

**मर्यादा:** सदरील संशोधन हे जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा खडकी बु येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

**जनसंख्या:** सदरील संशोधनात जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा खडकी बु येथील इयत्ता आठवीचे १२० विद्यार्थी जनसंख्या आहेत.

**न्यादर्श:** सदरील संशोधनात जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा खडकी बु येथील इयत्ता आठवीचे २० विद्यार्थी न्यादर्श म्हणून घेतले आहेत.

**संशोधन पद्धती:** सदरील संशोधनात संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धती वापरली आहे.

**संशोधनाची साधने:** सदरील संशोधनात संशोधकाने सहसंबंधगुणक (Pearson r) व ANOVA वापरला आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष**

१. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी व इंग्रजी विषयातील गुणांत उत्तम प्रतीचा सहसंबंध आढळून आला आहे.
२. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी व गणित विषयातील गुणांत उत्तम प्रतीचा सहसंबंध आढळून आला आहे.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2 – 2025



३. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी व गणित विषयातील गुणांत उत्तम प्रतीचा सहसंबंध आढळून आला आहे.

४. स्टार्स प्रकल्प अंतर्गत चाळीसगाव तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी, इंग्रजी व गणित विषयातील गुणांत उत्तम प्रतीचा सहसंबंध आढळून आला आहे.




| विषय | प्राप्त r | सहसंबंध |
|---|---|---|
| मराठी व इंग्रजी | ०.७६ | घनिष्ट सहसंबंध, उत्तम प्रतीचा सहसंबंध |
| मराठी व गणित | ०.७२ | घनिष्ट सहसंबंध, उत्तम प्रतीचा सहसंबंध |
| इंग्रजी व गणित | ०.८२ | घनिष्ट सहसंबंध, उत्तम प्रतीचा सहसंबंध |
| मराठी,इंग्रजी व गणित | ०.९१ (ANOVA) | उच्च प्रतीचा सहसंबंध |

## शिफारशी

### शासनासाठी शिफारशी

१. शासनाने स्टार्स प्रकल्प सक्तीने राबवावा.

२. त्यासंबंधी पाठपुरावे लवकर करावे.

३. फक्त सहाच नाही तर सर्व राज्यांत हा प्रकल्प राबवावा.

### मुख्याध्यापकांसाठी शिफारशी

१. मुख्याध्यापकांनी विषय शिक्षकांकडून पाठपुरावा करून अध्ययन क्षमतांची प्रगती तपासावी.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

२. अक्षमता प्राप्त विद्यार्थ्यांना क्षमता प्राप्ती साठीच्या नियोजनाचे मार्गदर्शन करावे.

३. शिक्षकांना विद्यार्थांमध्ये क्षमता वाढविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

४. क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी बक्षिसाची योजना करावी.

**शिक्षकांसाठी शिफारशी**

१. शिक्षकांनी अभ्यासक्रमाबरोबरच मुलभूत अध्ययन क्षमता विद्यार्थ्यांमध्ये आणाव्यात.

२. शिक्षकांनी क्षमता प्राप्त व अप्राप्त असे वर्गीकरण करावे.

३. क्षमता अप्राप्त विद्यार्थांसाठी विशेष उपाययोजना राबवावी.

४. क्षमता अप्राप्त विद्यार्थ्यांसाठी जादा तास, यु – ट्यूब व्हिडीओ दाखवून प्रयत्न करावे.

५. अशा विद्यार्थ्यांना "अभ्यासमित्र" नेमून त्यांना त्यांची जबाबदारी सोपवावी.

**पालकांसाठी शिफारशी**

१. पालकांनी पाल्याच्या क्षमता प्राप्तीची तपासणी स्वतः करावी.

२. पालकांनी नियमित शाळेत येऊन भेटी देऊन पाठपुरावा करावा.

३. शक्य असल्यास घरी यु – ट्यूब वरील क्षमता वृद्धी साठीचे व्हिडीओ पाहण्यास प्रोत्साहित करावे.

**विद्यार्थ्यांसाठी शिफारशी**

१. विद्यार्थ्यांनी क्षमता प्राप्तीसाठी स्वतः प्रयत्न करावे.

२. शाळेव्यतिरिक्त मित्रांकडून शिकावे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक-२०२३/प्र.क्र.०८एस.डी.-६- २४एप्रिल २०२३.

२. https://www.google.com/search?

३. https://byjus.com/govt-exams/stars-project/


Copyright © | JET Network, All Rights Reserved